नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १७/०५/२०२४ (शुक्रवार) दुपार**

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक
## वाहनासह एकुण २५,१०,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक १६/०५/२०२४ रोजी पोस्टे कन्हान येथील पोलीस स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, टाटा कंपनीचा ६ चक्का ट्रक क्र. एम एच—४/एन—०४४६ मध्ये अवैधरीत्या विनापरवाना रेती (वाळु) ट्रकमध्ये लोड करून वाहतुक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून नाकाबंदी केली असता ६ चक्का ट्रक क्र. एम एच—४/एन—०४४६ चा चालक **आरोपी नामे— मोहन शंकर तुमसरे, वय २६ वर्ष रा. बिना संगम खापरखेडा** याला स्टाफने थांबवून पाहणी केली असता वाहनामधील एकुण अंदाजे दिड ब्रास रेती मिळून आल्याने सदर वाहन चालकास ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीच्या ताब्यातून टाटा कंपनीचा ६ चक्का ट्रक क्र. एम एच—४/एन—०४४६ किंमती २५०००००/— रू. मध्ये दिड ब्रास रेती किंमती १००००/—रू. असा एकुण २५१००००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करून **१) मोहन शंकर तुमसरे, वय २६ वर्ष रा. बिना संगम खापरखेडा २) मोहम्मद हसीब सर्वर खान रा. बिना संगम खापरखेडा** यांचेविरुद्ध पोस्टे कन्हान येथे कलम ३७९ भादंवि., सहकलम ४८(८) ४८(७) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम—१९६६, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. कन्हान येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कन्हान येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक उमेश पाटील, सपोनि राहुल चव्हान पोलीस उपनिरीक्षक एकनाथ राठोड पोलीस अंमलदार बिसने, वैभव बोरपल्ले यांनी केली.

# गंभीर दुखापत करणाऱ्या आरोपीस नागपूर ग्रामीण पोलीसांनी केले अटक

पोस्टे कोंढाळी अंतर्गत सबकुंड ता. काटोल येथे दिनांक १५/०५/२०२४ चे २२.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. सिता सुभाष दुधकवरे, वय २७ वर्ष, रा. येरंडा ता. नरखेड ह. मु. सबकुंड ता. काटोल जि. नागपूर व **आरोपी नामे– प्रवीण उर्फ सावदया विनायक वाघाडे वय ३५ वर्ष रा. सबकुंड ता. काटोल** हे सख्खे बहीण भाउ असुन फिर्यादीचे लग्न झाले असुन फिर्यादी १५ दिवसापासुन माहेरी तिचे वडीलाकडे आली आहे. यातील आरोपी हा नमुद घटना वेळी व ठिकाणी घरी आला व फिर्यादीला म्हणाला की तु कशाला आली असे म्हणत भांडण सुरु केले व शिवीगाळी करायला लागला फिर्यादीने शिवीगाळी का बर करीत आहे असे म्हटले असता आरोपीने तिथे खाली पडलेला दगड उचलला व फिर्यादीचे तोंडावर मारला त्यामुळे फिर्यादीचे एक दात खाली पडला व एक दात अर्धा तुटला त्यामुळे फिर्यादीचे तोंडातुन रक्त निघत असता फिर्यादीचे लहान भाउ व वडील यांनी फिर्यादीला उपचाराकरीता सरकारी दवाखाना कोंढाळी येथे नेले होते तेथील डॉक्टरांनी प्राथमीक उपचार करुन तिला रेफर केले. सदर आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन कोंढाळी येथे अप. क्र. ३९२/२४ कलम ३२६, ५०४, ५०६ भादंवी चा गुन्हा नोंद करुन तपासात घेतला.

सदर गुन्हयातील आरोपीचा शोध कोंढाळी पोलीस घेत असता मिळालेल्या गोपनीय माहिती वरून **आरोपी नामे– प्रवीण उर्फे सावदया विनायक वाघाडे, वय ३५ वर्ष रा. सबकुंड ता. काटोल** यास ताब्यात घेण्यास कोंढाळी पोलीसांना यश आले. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सलीम शेख हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कोंढाळी येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक राजकुमार त्रिपाठी, सफौ राजकुमार कोल्हे, पोलीस अंमलदार मंगेश, प्रशांत यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर